## फौजदारी चौ. अर्ज क्र.४४/२०१९ मध्ये नि.क्र.२२ वर आदेश.

**कार्तीकी मोरे वि. नरेश मोरे.**

(सीएनआर क्र.**MHRG**–13000–143–2019)

०१. सदर प्रकरणात सामनेवाला यांनी त्यांचे विरुध्द विना उलट तपास झालेला आदेश रद्द करुन उलटतपास घेण्याच परवानगी मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०२. त्यांनी अर्जामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार यांनी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिनांक ११/०३/२०२० रोजी दाखल केल्यानंतर ताळेबंदीमुळे न्यायालयाचे कामकाज बंद होते. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दरम्यानच्या काळामध्ये सामनेवाला यांच्या आईचा अपघात झाला तसेच मृत्यू झाला. त्याच बरोबर सामनेवाला यांच्या वकिलांनी तो कोवीडची लक्षणे आढळल्याने अर्जदाराचा उलटतपास घेणे शक्य झाले नाही. या कारणास्तव त्यांनी सामनेवाला यांना उलटतपासाची संधी देण्याबाबत विनंती केली आहे.

०३. अर्जदारातर्फे वकीलांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले असून सदर म्हणण्यामध्ये त्यांनी अर्जातील कथने तर्कसंगत नसल्याचे कथन करुन सामनेवाला यांनी न्यायालयाचा वेळ घालवल्याचे कथन करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रस्तुचे प्रकरणी अर्जदार यांचे सरतपासाचे शपथपत्र दिनांक ११/०३/२०२० रोजी दाखल असून दिनांक २५/१०/२०२१ रोजी सदर प्रतिज्ञापत्रावर विना उलटतपासाचा आदेश झाला आहे. या प्रकरणी अभिलेखाचे

अवलोकन केले असता सामनेवाला यांच्या आई या दिनांक ३०/११/२०२० रोजी मयत झाल्याचे मृत्यू दाखल्यावरुन दिसून येते. परंतु न्यायालयाचे नियमित कामकाज दिनांक ०१/०२/२०२१ रोजी सुरु झाले असून मार्च २०२० ते फेब्रुवारी २०२१ हा कालावधी कोरोना महामारीच्या काळातील असल्याने त्या काळातील बाब माफी योग्य आहे. सदर प्रकरणातील पक्षकारांमध्ये वादाचे कायम स्वरुपी निराकरण होण्यासाठी नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने सामनेवाला यांना पुर्ण संधी देणे न्यायोचित होणार आहे. सबब, सामनेवाला यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. तथापि, सप्टेंबर २०२१ नंतर न्यायालयाचे कामकाज सुरु झाल्यानंतर देखील सामनेवाला यांनी उलटतपास का घेतला नाही याचे कारण स्पष्टपणे नमुद केलेले नाही. त्यामुळे त्या करीता कॉस्ट बसवणे गरजेचे आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

:: **आदेश** ::

०१. नि.क्र.२२ वरील अर्ज रक्कम रुपये ५००/- च्या कॉस्टवर मंजूर करण्यात येत आहे.

०२. येणे प्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

श्रीवर्धन. ( प्र. ग. लंबे )
दिनांक : ०४/०१/२०२२. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, श्रीवर्धन.

..